# प्रेस नोट

## " महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना तपासणी शिबीर"

जा.क्र. ५३० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:– २४/०७ /२०१७

**भंडारा**: पोलीस मुख्यालय येथील बहुउद्देशीय हॉलमध्ये २४ जुलै २०१७ पोलीस विभाग, श्रीकृष्ण हॉस्टीपल, कारेमोरे हॉस्पीटल तुमसर यांच्या विदयमानाने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन मा. पोलीस अधिक्षक विनीता एस, अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर, यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. रवि धकाते, श्रीकृष्ण हॉस्पीटल नागपुर येथील प्रमुख पाहुणे कोऑर्डीनेटर डॉ. सागर हे होते, डॉ. शैलेश, डॉ. समीर, तुमसर येथील सिटी मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पीटल डॉक्टर कारेमारे तसेच त्यांचे सहकारी, भंडारा येथील पोलीस युनिट रूग्णालयाचे डॉ.डब्लु बि. कोचे श्री एच जी. चारमोळे, उदारामजी उके हे उपस्थित होते.

यावेळी जिल्य शल्य चिकीत्सक डॉ. रवि धकाते यांनी आपल्या भाषणामधुन अधिकारी/कर्मचारी यांनी सर्व प्रकारच्या टेस्ट करुन प्रकृतीची काळजी कशी घ्यावी याविषयी माहिती दिली. तसेच योगा, मेडीटेशंन सर्वानी वेळात वेळ काढुन करायला पाहीजे. त्यामुळे त्यांचे जीवन चांगले राहणार, पोलीस विभागांचे अधिकारी/कर्मचारी सण उत्सव असते तेव्हा कर्तव्यावर हजर रहावे लागते, तसेच पोलीस विभागात वेळेची काही रूटिंग नसतो त्यामुळे त्यांचे आरोग्यावर परिणाम दिसुन येतो तसेच त्यांचे कुंटुबियांना सुध्दा वेळ देवु शकत नाही. पोलीसांच्या धकाधकीच्या जिवनात ते स्वता:चे आरोग्यकडे लक्ष दयायला वेळ नसतो.

मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता एस यांनी भाषणातुन पोलीसांचे जीवन धकाधकीचे असल्याने त्यांना वेळेवर जेवन, झोप, आरोग्याची काळजी घेणे शक्य होत नाही. पोलीस विभागांचे अधिकारी/कर्मचारी हे २४ तास आपले कर्तव्य बजावत असतो. कुंटुबाकडे लक्ष दयायला वेळ नसतो. त्याचा परीणाम कुंटुबावर सुध्दा होतो त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम दिसुन येतो. पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या तसेच कुंटुबीयांच्या वैद्यकीय तपासणी बाबत मार्गदर्शन केले.

सदर वैद्यकीय तपासणी दरम्यान पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा श्री. एस. व्ही. कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड, जिवीशा कार्यालय पोनी. सिडाम पोलीस मुख्यालय उपनिरीक्षक श्री. प्रधान जिल्हातील सर्व पोलीस स्टेशनचे/शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस कुंटुबीय उपस्थित होते.

कार्यशाळेचे संचालन म. पो.शि. नाकतोडे यांनी केले व आभार प्रदर्शन पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा श्री. एस. व्ही. कुलकर्णी यांनी केले.

पोउपनि. (जे. एन. लाकडे)
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४०३४३८५४६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.